# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे —**

**(क) मुख्यमंत्री** : "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(१)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा एकोणसाठावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२)** "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा तेहेतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(४)** "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५)** "उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) खनिकर्म मंत्री** : "मॉईल लिमिटेड यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा

पंचावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(घ) **वस्त्रोद्योग मंत्री** : (१) "महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "लोकलेखा समितीचा एकोणतीसावा अहवाल सादर करणे."**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **(मंगळवार, दिनांक १२, बुधवार, दिनांक १३, गुरुवार, दिनांक १४ व शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —**

**सर्वश्री. जयंत पाटील,** बाळाराम पाटील, सुनिल तटकरे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जयवंतराव जाधव **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"अरबी समुद्रात उसळलेले ओखी चक्रीवादळ रायगड समुद्र किनाऱ्यावर येऊन धडकल्याने राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात दिनांक ४ डिसेंबर २०१७ रोजी अवकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळणे, विशेषत: रायगड जिल्ह्यात आंबा, काजूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होणे, परंतु अवकाळी पडलेल्या पावसामुळे आंबा तसेच काजूवरील मोहर गळून पडल्याने यावर्षी आंबा व काजू उत्पादनात घट होणार असल्याने बागायतदारांचे मोठे नुकसान होणे, तसेच सुपारीची साठवणूक करणाऱ्या सहकारी संस्थांची सुपारी भिजल्यामुळे त्यांनाही आर्थिक फटका बसणे, अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) खंडाळे, वाडगाव, सहाण, उसर, वावे तसेच वाघ्रण, परहूरपाडा आदी ठिकाणी पांढऱ्या कांद्याचे मोठया प्रमाणात उत्पादन घेण्यात येत असून, अवकाळी पडलेल्या पावसामुळे येथील कांद्याची रोपे मोडून पडणे व शेतात पाणी साचले असल्याने त्याचा परिणाम कांदा उत्पादनावर होणे, पावटा, तूर व इतर कडधान्य पीकांचे बऱ्याच प्रमाणात नुकसान होणे, तसेच अनेक ठिकाणी मळणीची कामे अजूनही प्रलंबित असल्यामुळे पावसामुळे भात भिजल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणे, पावसामुळे पेंढयांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान

झाल्याने शेतकऱ्यांसमोर गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे, देवगड तालुक्यातील पडवणे, मिळबाव, सांबळडेग येथील रापण कंपनीच्या जाळीचे झालेले नुकसान, तर नाशिकसह निफाड, दिंडोरी, चांदवड, सटाणा या तालुक्यातील अनेक भागात मुसळधार पावसामुळे द्राक्षबागा, कांदा, डाळींब आणि गहू पिकाचे झालेले मोठ्या प्रमाणात नुकसान तसेच पुणे जिल्ह्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस पडल्याने त्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पेरलेल्या पिकांचे झालेले प्रचंड नुकसान, रायगड जिल्हयात काही ठिकाणी मच्छिमारांच्या बोटी बुडणे व बोटींचे नुकसानही होणे शासनाकडून या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **(शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —**
**सर्वश्री. शरद रणपिसे,** संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. सुभाष झांबड, हरिसिंग राठोड, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. जनार्दन चांदूरकर, अमरनाथ राजूरकर, डॉ. सुधीर तांबे, आर्कि. अनंत गाडगीळ, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. हेमंत टकले, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सन २००९ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने फेरीवाल्यांच्या पुनर्वसनासाठी व नागरीकांना त्रास होऊ नये यासाठी महानगरांना फेरीवाला धोरण तयार करण्याचे दिलेले आदेश, त्यानुसार सन २०१४ मध्ये फेरीवाला धोरण मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर केलेले असणे, त्यावर पुढील कार्यवाही झालेली नसणे, तदनंतर सन २०१४ मध्येच राज्य शासनाने फेरीवाला धोरणाचा मसुदा जाहिर केलेला असणे, त्यानंतर राज्य शासनाने फेरीवाला धोरण फेब्रुवारी, २०१७ च्या सुमारास संमत केलेले असणे, मात्र त्याच्या अंमलबजावणी संदर्भात पुढील कार्यवाही प्रलंबित असणे, मुंबईत सुमारे तीन लाख फेरीवाल्यांचा असलेला प्रश्न, मुंबईतील एल्फिन्स्टन रोड रेल्वे स्टेशनवरील दुर्घटनेनंतर माहे सप्टेंबर, २०१७ पासून फेरीवाल्यांचा ऐरणीवर आलेला प्रश्न, विविध पक्ष, संघटना यांचेकडून होत असलेली आंदोलने याचा विपरित परिणाम होऊन मुंबई लगतच्या वसई, कर्जत, कसारा इ. भागातून मुंबईमध्ये येऊन आपला शेतीमाल विकणाऱ्या शेतकऱ्यांचा बंद पडलेला व्यवसाय, त्यात सुयोग्य तोडगा काढण्याची व आंदोलनात नागरीकांना त्रास होऊ नये यासाठी लक्ष देण्याची गरज, फेरीवाला धोरणाबाबत तातडीने लक्ष न दिल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची निर्माण झालेली स्थिती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व

शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. किरण पावसकर,** हेमंत टकले, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. संजय दत्त, शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेची संस्थांना दिलेली २१६ मैदाने, उद्याने, क्रीडांगणे, खाजगी संस्थांकडून ताब्यात घेण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना देणे, त्यानुसार तब्बल १२८ भूखंड ताब्यात घेण्यात येवून कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात येणे, परंतु आता आयुक्तांकडून पुन्हा ही मैदाने खाजगी संस्थांना ११ महिने देखभालीसाठी देण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्यावर पालिका सभागृहात सत्ताधारी पक्षाकडून शिक्कामोर्तब होणे, सन २००७ मध्ये महानगरपालिकेने मोकळ्या जागांची दत्तक योजना आणली त्यानुसार मोकळ्या जागांवरील २५ टक्के भागात क्लब, उपाहारगृह किंवा बार बांधायला परवानगी द्यावी आणि त्या मोबदल्यात उरलेल्या जागेचा विकास आणि देखभाल करुन ती सामान्य लोकांना मोकळी ठेवण्याची प्रस्ताव करण्यात येणे, मुंबई महापालिका सार्वजनिक मोकळ्या जागा सांभाळण्याबाबतच्या धोरणाबाबत कायम उदासिन असणे, अर्थसंकल्पात मैदानासाठी भरीव तरतूद करुनही निधी ५० टक्के वापरला जात नसणे, महानगरपालिकेकडे स्वत:ची यंत्रणा असूनही या जागा खाजगी संस्थांच्या ताब्यात देवून त्यांच्या घशात घालण्याचा डाव रचला जात असणे, महानगरपालिकेच्या २१६ जागांपैकी २९ संस्थांकडून पालिकेला मोकळया जागा मिळवता आलेल्या नसणे, या जागांवर अनधिकृतपणे बांधकामे उभी असणे, पालिकेची आर्थिक स्थिती उत्तम असूनही महानगरपालिकेकडून जागा खाजगी संस्थांच्या घशात घालण्याचा कट आयुक्त आणि सत्ताधारी यांच्या संगनमताने होत असणे, याबाबत शासनाच्या होत असलेल्या अक्षम्य दुर्लक्षाबाबत जनतेत असलेला प्रचंड संताप व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्रीमती विद्या चव्हाण,** सर्वश्री. हेमंत टकले, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या गंभीर पार्श्वभूमीवर ७ ते ११ लाख घरे बांधण्याचे सरकारने घोषित करणे, मात्र त्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध नसणे, मुंबईत गिरणी कामगार, असंघटीत कामगार, कमी उत्पन्न गटातील गरजूंना निवारा देण्याची गरज निर्माण होणे, मात्र उद्दिष्ट पूर्तीसाठी सरकारकडे आपल्याच जमिनींचा डोळ्यादेखत व्यापार पाहत बघण्यासारखी स्थिती निर्माण

होणे, कमाल जमीन धारणा कायदा, १९७६ अन्वये त्यावेळी उद्योग विस्तार आणि विकास आणि कामगार हिताकरिता उद्योगांना सरकारी जमिनी लीज तत्वावर नाममात्र भाडे तत्वाने देण्यात येणे, उपनगरात ४५०० एकर जमीन लीजवर असणे, १,४५,२२३ चौ.मी. जमीन लीजवर असणे, या जमिनीवर उद्योग विस्तारांच्या नावाखाली निवासी वाणिज्यिक टोलेजंग इमारती उभ्या करण्यात येणे, त्यातील सदनिका चढ्या भावाने विकण्यात येणे, गरिबांना, कामगारांना आणि मध्यमवर्गीयांना घरे नाकारण्यात येणे, एल ॲन्ड टी सारख्या जागतिक स्तरावरील नामांकित कंपनीने कारखाना विस्तार करण्याकरिता आणि कामगारांच्या घरांकरिता सरकारी जमीनींचा गैरवापर करणे, सदर जमीनींची सन २००९ मध्ये स्मिथ प्रॉपर्टी यांचेकडून बोगस करारनाम्याद्वारे अनेक वेळा बेकायदेशीर रित्या खरेदी विक्री करण्यात येणे, पवईतील हिरानंदानी घोटाळ्याप्रमाणे पुनरावृत्ती होणे, या घोटाळ्याची गुन्हा अन्वेषण विभागाकडून चौकशी करण्याची मागणी होणे, त्यामुळे सरकारी जमिन खाजगी नफेखोर कंपन्यांच्या ताब्यात असल्यामुळे आणि मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरातील शेकडो एकर जमिनी सरकारकडून लीजवर तर काही ठिकाणी त्या खरेदीखताद्वारे विकत घेवून या जमिनींवर मोठमोठे ७० ते ८० मजल्यांचे टॉवर बांधकाम करुन प्रती चौरस फूट ३० ते ५०,००० आणि रुपये १,००,०००/- इतक्या चढ्यादराने बडे भांडवलदार, आणि गर्भश्रीमंत, व्यवसायिक यांना विकणे, आणि त्यामुळे विकासक आणि बिल्डर यांची नफेखोरी बेसुमार वाढणे, हि घरे विकत घेतल्यानंतर त्या घराचा मालमत्ता कर, देखभाल दुरुस्ती खर्च सूध्दा तितकाच चढा असल्याने मासिक लाखो रुपयांचे मेन्टनन्स मध्यमवर्गीय ग्राहकाला कर्जबाजारी करीत असल्यामुळे या उच्च दर्जाच्या सुविधाजनक घरांचा लाभ मिळू न शकणे त्यातच कित्येक इमारतींमध्ये आर्थिक मंदीमुळे मोठ्या प्रमाणात घरे उपलब्ध असूनही त्यांची विक्री न होण्यामुळे लाखो घरे रिक्त रहाणे आणि मुंबईकर नागरीकांची घरांची गरज पाहता शासनाने या घरांच्या जमिनींचा मालकी हक्क, लीज करारनामे, जमिनींचा झालेला व्यवहार, तपासून आणि पुनर्विलोकन करुन सध्याचा बाजारभाव आणि विकासक बिल्डरांची गुंतवणूक आणि नफ्याचे परिणाम ठरवून शासनाचा महसूली नफा ठरवून मध्यमवर्गीय नागरीकांचे घरांचे स्वप्न पूर्ण करताना जमिनीचे बाजारभावाचे दर निश्चिती करुन सरकारचे प्रत्येकाला घर हे आश्वासन पूर्ण करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(५) **प्रा. अनिल सोले,** सर्वश्री. गिरीशचंद्र व्यास, नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गडचिरोली जिल्हा परिषद अंतर्गत सन २०१३ मध्ये २२० शिक्षकांचे

बोगस बदली प्रकरण उघडकिस येणे, सदर बोगस बदली प्रकरणातील ७३ शिक्षकांच्या बदली विषयक नस्त्या गहाळ असल्याबाबत जि.प. गडचिरोली यांनी नियमबाहय बदल्या रद्द करण्याबाबत चौकशी अहवालात मु.का.अ. जि.प. गडचिरोली यांनी आयुक्तांकडे शिफारस करणे, सदर बदली प्रकरणात दोषी असलेले जबाबदार अधिकारी व कर्मचारी तत्कालीन मु.का.अ. यांचे अधिनस्त असल्याचे दिसून येणे, सदर प्रकरणातील दोषींवर कार्यवाही करण्याची महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, नागपूर विभाग यांचेकडून होत असलेली मागणी, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६)** **श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) दाभाडी येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील सुमारे ७६ विद्यार्थ्यांना दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अन्न पदार्थातून विषबाधा झाल्याचे उघडकीस येणे, आश्रमशाळेतील दुषित पाणी व निकृष्ट आहार यामुळे विषबाधा झाल्याचा संशय असणे, विषबाधा झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात येणे, पालघर जिल्हा मुख्यालयाच्या इमारतीच्या भूमिपुजनाचा कार्यक्रम होईपर्यंत या घटनेची गुप्तता प्रशासनाद्वारे पाळण्यात येणे, या पार्श्वभूमीवर आश्रम शाळेतील दुषित पाण्याची वा अन्नपदार्थांची प्रयोगशाळेत तपासणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७)** **सर्वश्री. धनंजय मुंडे,** जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात अन्नसुरक्षा व मानके कायद्याची अंमलबजावणी झाल्यापासून नागपूरस्थित हल्दीराम या कंपनीने उत्पादित केलेले काही अन्न नमुने अप्रमाणित (Substandard) आलेले असूनसुध्दा कायद्यातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई न करता सदर प्रकरणी निर्दोष सुटका केली असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, हल्दीराम उत्पादक संस्थेची कायद्यातील तरतुदींनुसार सखोल तपासणी न करता उत्पादक असूनसुध्दा थातूरमातूर तपासणी केल्यामुळे तपासणी अहवलानुसार कोणतीही कार्यवाही केली जात नसणे, हल्दीराम यांनी उत्पादीत केलेले अन्न नमुने विश्लेषणास्तव घेवून सदर अन्न नमुने किटकनाशके व बॅक्टेरीयल चाचणीची सुविधाच नसलेल्या अन्नचाचणी प्रयोगशाळेत विश्लेषणास पाठवून सर्व नमुन्यात सालमोनेला बॅक्टेरियाची चाचणी तसेच किटक नाशकाबाबत चाचणी न करता किटक नाशकाचा अंश व सालमोनेला

बॅक्टेरिया आढळून आला नाही असे उत्तर सदनात देऊन सदनाची दिशाभूल करणे, अशा गंभीर बाबी पावसाळी अधिवेशन सन २०१५ दरम्यान उघड होणे, यामुळे हल्दीराम या उत्पादकाला सरकारी यंत्रणेतील सर्व स्तरावर संरक्षण मिळत असल्याची बाब निदर्शनास येणे, यात मोठा भ्रष्टाचार सुरु असणे, या प्रकरणी चौकशी करुन भ्रष्ट अधिकारी हल्दीरामवर कारवाई करण्याऐवजी अन्न व औषध प्रशासन या भ्रष्ट अधिकाऱ्यांना व हल्दीराम कंपनीस पाठीशी घालत असणे, या घोटाळ्याची सखोल चौकशी होऊन यात सामील अधिकाऱ्यांवर व हल्दीराम या उत्पादकावर कारवाई होणे आवश्यक असणे, हल्दीराम या उत्पादकाच्या सर्व उत्पादन संस्थेची मुख्यालय गुप्तवार्ता विभागामार्फत सखोल तपासणी करुन अन्न नमुने विश्लेषणास्तव घेवून त्यात सालमोनेला व इतर बॅक्टेरिया तसेच किटकनाशकाच्या चाचणीची सुविधा असलेल्या प्रयोगशाळेत पाठविण्याची कार्यवाही करणे आवश्यक असणे, याबाबत जनतेत पसरलेले भितीचे व संभ्रमाचे वातावरण, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(८)** **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाद्वारे दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) हे विधेयक पारित करण्यात येणे, या अधिनियमानुसार आधुनिक माहिती व तंत्रज्ञान यांच्या आधारावर व्यापार करण्याच्या हेतू असून शासनाचे उद्योग व्यवसाय सुलभीकरण धोरण या धर्तीवर १० पेक्षा कमी असलेल्या अति लहान व लहान आस्थापनांना अधिनियमातील नोंदणीतून वगळून सर्व सेवा ऑनलाईन देण्याची गरज असणे, या अधिनियमात पुर्वीच्या अधिनियमातील कामगारांच्या हितकारक तरतुदी बाजुला ठेऊन केवळ मालक धार्जिण्या तरतुदी असणे, या कायद्यात १० पेक्षा कमी असलेल्या आस्थापनांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ नूसार, या अधिनियमातील कलम क्रमांक १ (३) नुसार कोणत्याही तरतूदी लागू होणार नसणे, प्रस्तुत अधिनियमांतर्गत असंघटीत क्षेत्रातील म्हणजेच १० पेक्षा कमी असलेल्या आस्थापनांतील कामगारांवर अन्याय झाल्यास किंवा त्यांच्या मुलभूत हक्कांवर गदा आल्यास त्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसल्याचे दिसून येणे, बृहन्मुंबईमध्ये सद्य:स्थितीत ८ लाख इतक्या व्यापारी आस्थापना नोंदणीकृत असून त्यापैकी १० पेक्षा कमी असलेल्या अंदाजे ७,५०,००० आस्थापनांमध्ये १५ ते २० लाख कर्मचारी असून सदर कर्मचाऱ्यांना कोणतेही अभय देण्यात आलेले नसणे, मुंबई शहर व मुंबई उपनगरांमध्ये अस्तित्वात असलेल्या १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या लहान आस्थापनांमध्ये बहुतांशी मराठी भाषिक असंघटीत कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे

मुलभूत हक्काद्वारे मिळणारे किमान वेतन, कामाचे तास, साप्ताहीक सुट्टया, भरपगारी रजा, आरोग्याच्या सेवा व सुविधा इत्यादीबाबत त्यांच्यावर मालकांकडून अन्याय व पिळवूणक होणार असल्याने अशा असंघटीत कामगारांवर अन्याय होणार असून राज्य शासनाच्या या मालक धार्जिण्या धोरणामुळे कामगारांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, यबाबात शासनाने सदरच्या अधिनियमात लहान आस्थापनांतील कामगारांना सरंक्षण देण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सात : सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस.)**

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.

**१.** शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ मंत्री.

**२.** ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री.

**३.** अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री.

**४.** वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री.

**५.** परिवहन, खारभूमी विकास मंत्री.

**६.** ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री.

**७.** पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री.

**८.** जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री.

**९.** सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री.

**आठ : शासकीय विधेयके -**
**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

(४) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**नऊ : (शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (अनुक्रमांक (क) व (ख)) —**

**(क) सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.जयवंतराव जाधव, चंद्रकांत रघुवंशी, दत्तात्रय सावंत, विक्रम काळे, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदुरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री.बाळाराम पाटील, अमरनाथ राजुरकर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) —**

"राज्यात शासनाने कर्जमाफी योजना जाहीर करणे, कर्जमाफी जाहीर होऊन सहा महिन्यापेक्षाही जास्त कालावधी होऊनसुध्दा अद्यापही शेतकऱ्यांच्या

बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नसणे, कर्जमाफीची घोषणा झालेली असली तरी सुध्दा कर्ज वाटपाचे नियोजन व्यवस्थित न झाल्याने कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर राज्यात अद्याप सुमारे १५०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, इनोव्हेव या कंपनीचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी या योजनेत ऑनलॉईन पध्दतीने अर्ज मागवून नंतरच कर्जमाफी रक्कम देण्याचा घाट घातलेला असणे, ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी शेतकऱ्यांना अनंत अडचणीचा सामना करावा लागत असणे, शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणाऱ्या रकमांची सरकारच्या वतीने वारंवार खोटी आकडेवारी जाहीर करण्यात येणे, मात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर किती रक्कम जमा झाली याची जिल्हानिहाय व तालुका निहाय आकडेवारी जाहीर करण्याचे मात्र सोईस्कररित्या टाळणे, राज्यात ९० टक्के पेक्षा जास्त बी.टी.कॉटन कापसावर बोंड अळीचे संकट येणे, शेतकऱ्यांच्या कापसाचे ९० टक्के पेक्षा जास्त नुकसान होणे, हे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या फवारणीमुळे राज्यातील ३० पेक्षा जास्त शेतकऱ्यांचा मृत्यु झालेला असणे, कॉटन रिसर्च इन्स्टीट्युट यांनी डिसेंबर, २०१५ मध्येच बोंड अळीबाबत अहवाल दिल्यानंतर या येऊ घातलेलया संकटाकडे जाणीव करुन दिलेली असणे, बोगस कंपन्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारामुळे हे संकट आलेले असणे, यात कोट्यावधी रुपयांचा कॉटन सिड स्कॅम असणे, राज्यात तूर, सोयाबीन, कापूस, उडीद, मुग यांची खरेदी होत नसणे, धानाचे केंद्र अद्याप सुरू झालेली नसणे, शेतकऱ्यांकडून सक्तीने संजीवनी योजनेच्या नावाखाली वीज बिलाची वसुली करण्यात येणे, राज्यातील मुंबईसह कोकणात ओखी वादळामुळे मच्छिमार व आंब्यासह सर्व फळ पिकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, किनारपट्टीवरील शेतकऱ्यांच्या पिकांबरोबरच घरांचेही नुकसान झालेले असणे, अनेक मच्छिमारांचे संसार उध्वस्त झालेले असणे, बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, त्यामुळे कोकणातील शेतकरी सुध्दा हवालदील झालेला असणे, याबरोबरच उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या काही भागात ओखी वादळामुळे हवामानात बदल होऊन पिकांवर किड रोगाचा प्रादुर्भाव वाढून नुकसान झालेले असणे, धानाच्या पिकावर मावा, तुडतुडे रोगाचा मोठा प्रादुर्भाव झालेला असणे, त्यामुळे उत्पादनात घट होणे, सर्वच शेतमालाला भाव न मिळणे, कृषी पिक विमा योजनेत खरीप व रब्बी हंमागातील पिक विमा नुकसान भरपाईसाठीचा हप्ता हजारो शेतकऱ्यांनी बँकेत भरणे, बँकांच्या हलगर्जीपणामुळे लाखो शेतकऱ्यांना पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम मिळालेली नसणे, अनेक बँकांनी मंजूर विम्याची रक्कम इतरत्र गुंतवणूक करुन त्यावर कोट्यावधी रुपयांची नफेखोरी करणे, त्यातच कर्जमाफी न मिळणे, बोंड अळीमुळे आलेले संकट, यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये वैफल्यग्रस्तता वाढून आत्महत्यांचे वाढत जाणारे सत्र, शेतकऱ्यांना दिलासा

देण्यासाठी तातडीने त्यांना कर्जमुक्त करणे, बोंड अळीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल एकरी २५ हजार रुपये मदत देण्याची आवश्यकता, सक्तीने होणाऱ्या वीजबिल वसुलीला स्थगिती देणे, हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याची आवश्यकता, ओखी वादळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत मदतीची गरज, या सर्व बाबतीत शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख)** **प्रा.अनिल सोले,** ॲड. अनिल परब, श्री.गिरीश व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परिणय फुके, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. तानाजी सावंत, मितेश भांगडिया, गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, विनायक मेटे, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाड्यात पडलेला कमी पाऊस, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चित करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ.पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती इ. जनावारांमुळे होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सोलर फिडरची योजना कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी

योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुहे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांपेक्षा एकट्या मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाने धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी खात्यातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे व संत्रा धोरण जाहिर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री. अनिल भोसले, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे येथील मुळा-मुठा नदीपात्रात अतिक्रमणांची संख्या वाढलेली असणे, नदीपात्रात मंगल कार्यालये, हॉटेल पूर रेषेत बांधलेली असणे तसेच नदीपात्रात सांडपाणी टाकण्यात आल्याने पूरसदृश्यस्थिती निर्माण झालेली असणे, नदीपात्रातील अतिक्रमणावर कारवाई होण्याची आवश्यकता असतानाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झालेले असणे, पुणे येथील मुळा-मुठा नदीपात्रातील अतिक्रमणे निष्कासित करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(२) श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील आरोग्य विभागात डॉक्टर नसणे, ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना चांगली सेवा उपलब्ध व्हावी यासाठी शासनाच्या आरोग्य-सेवा कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन आणि शालेय

आरोग्य कुटुंब कल्याण विभागाच्यावतीने ठाणे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी कंत्राटी पद्धतीवर मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली असणे, हे मानसेवी अधिकारी शासनाच्या नियमाप्रमाणे नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करून त्या परिसरातील रुग्णांना तात्काळ सेवा उपलब्ध करून देणे गरजेचे असताना ते नियुक्तीच्या जागी वास्तव्य करत नसणे, या अधिकाऱ्यांना ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णांना सुवर्णकाळात सेवा पुरविता येण्यासाठी देण्यात आलेली वाहने शासनाच्या काही अटींमुळे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बंद असणे, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १६ डिसेंबर, २०१७.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.